# कांदा लागवड व व्यवस्थापन तंत्रज्ञान

महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे कांदा पिकवनारे राज्य आहे. महाराष्ट्राचे हवामान वर्षभर म्हणजे खरीप, रांगडा, रब्बी (उन्हाळी) हंगामात पोषक आहे.





## हंगाम

**१.पौळ कांदा लागवडः** या मध्ये बी जून महिन्यात पाऊस पडल्यानंतर गादी वाफ्यावर टाकतात. साधारणत ऑगस्ट महिन्यात सरी वरंब्यावर लागवड होते, काढणी नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यात होते.

या हंगामाच्या कांद्याची लागवड कमी असते म्हणून भाव चांगला मिळतो. परंतु करपा रोगाचा, ढगाळ वातावरणाचा, प्रतिकूल परिणाम होतो, त्या मुळे उत्पादन १०० ते १५० क्विंटल येते. या हंगामात एन ५३, फुले समर्थ , बसवंत ७८०, अग्रि फाऊंड डार्क रेड, भीमा सुपर या जातीची लागवड होते.

**२.रांगडा कांदा :** या कांद्याची लाघवड खरीपाची बाजरी काढणीनंतर केली जाते. बी जुलै-ऑगस्ट महिन्यात गादी वाफ्यावर टाकतात. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्या पासून ते ऑक्टोबर मध्ये लागवड होते, थंडीच्या काळामुळे पात जास्त वाढते, काही प्रमाणात गोंडे

**३. उन्हाळी कांदा :** बी ऑक्टोबर - नोव्हेंबर महिन्यात गादी वाफ्यावर टाकतात. या कांद्याची काढणी मार्चच्या शेवटच्या आठवड्या पासून मे च्या पहिल्या आठवड्या पर्यन्त करतात. महाराष्ट्रात या हंगामात सर्वात जास्त क्षेत्र लागवडीखाली असते . या हंगामात २५० ते ३०० उत्पादन येते. या हंगामात साठवणूक क्षम असलेले वाण वापरले जाते N-2-4-1 - FLR, अरका निकेतन. फुलतात ,कांद्याची मान जाड राहते,त्या मुळे या कांद्याची साठवण क्षमता निकृष्ट प्रतीची असते. या हंगामात बसवंत ७८० (लाल कांदा), N-2-4-1, फुले समर्थ (गर्दलाल रंग) या जातीची लागवड होते.

## जमीन

कांदा पिकासाठी जमीन सुपीक हलकी ते मध्यम भारी, रेती मिश्रित तसेच पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी. अति भारी जमीन जास्त ओलावा धरून ठेवणारी व पाण्याचा निचरा लवकर न होणारी कांदा लागवडीसाठी निवडू नये.

## जमिनीची पूर्व मशागत

कांदा जमिनीच्या वरील थरात पोसत आसल्याने २५-३० सेमी खोल नांगरणी करावी व जमीन उन्हात तापू द्यावी. ट्रॅक्टर असेल तर मोगडा किंवा रोटाव्हेटरने अथवा कुळवाच्या आडव्या, उभ्या दोन पाळया देऊन धसकटे वेचून जमीन स्वछ व भुसभूशीत करावी. खरीप हंगामात सरीवरंब्यावर व ईतर हंगामात सपाट वाफ्यात दोन ओळीत १५ सेमी आणि दोन रोपात १० सेमी अंतर ठेऊन लागवड करावी.

## रोपे तयार करणे

गादीवाफा १ मी रुंदीचा व ३ते ४ मी लांबीचा व १५ सेमी उंचीचा तयार करून प्रत्येक वाफ्यात दोन घमेली चांगले कुजलेले शेणखत, १०० ग्राम १५:१५:१५ व ५० ग्राम कॉपर ओक्सीक्लोराईड हे बुरशींनाशक टाकून वाफे चांगले घोळून घ्यावेत. एक हेक्टर साठी साधारणतः ८-१० किग्र बियाणे लागते. बियाण्यास २ ग्रॅम कर्बेनडेझिम प्रती किलो चोळून घ्यावे रोप उगवल्या नंतर प्रत्येक वाफ्यात ५० ग्राम युरिया व ५ ग्राम फोरेट रोपच्या दोन ओळीत द्यावेत. बुरशींनाशकाच्या व कीटकनाशकाच्या १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारण्या घ्याव्यात. साधारणतः ६ ते ८ आठवाड्यात रोपे लागवडीस योग्य होतात. लागवडीपूर्वी २ ते ३ दिवस रोपांना हलके पाणी द्यावे. लागवडीपूर्वी १० लिटर पाण्यात १० ग्राम बावीस्टिन व १० एमएल प्रोफेनोफोस/ फीप्रोनील च्या द्रवणामध्ये रोपांची शेंडे कापून रोपे बुडवून नंतर लागवड करावी.

## खत व्यवस्थापन

कांदा पिकास हेक्टरी ४० ते ५० बैलगाड्या शेणखत व १००:५०:५० नत्र, स्फुरद व पालश हेक्टरी द्यावेत नत्राची मात्रा दोन भागात विभागून द्यावी. सल्फर २५ ते ३५ किलो प्रती हेक्टर खतासोबत वापरल्यास कांद्यास चांगली चकाकी येते व कांदा उठावदार दिसतो व रोगांचे प्रमाण कमी दिसते.

## आंतरमशागत

कांदा लागवडी नंतर १५ दिवसाच्या अंतराने ३ खुरपण्या कराव्यात कांदा पिकात तणनाशक ओक्सीफ्लोरोफेण २ ते ४ मिलि प्रती पंम्प वापरल्यास तण नियंत्रणात येते. तणनाशकाचा वापर आवश्यकतेनुसार करावा २ फवारणीत २ ते ३ आठवड्याचे अंतर ठेवावे.

## पाणी व्यवस्थापन

खरीप हंगामात गरजेनुसार ८ ते १० पाण्याच्या पाळ्या रब्बी/ उन्हाळी कांद्यास ६ ते ८ दिवसाच्या अंतराने १५ ते २० पाळ्या द्याव्यात. कांदा काढणीपूर्वी ३ आठवडे पाणी तोडावे. ५० ते ७५ % माना पडल्यावर कांदा काढणीस सुरवात करावी.

## रोग व कीड नियंत्रण

कांद्यावर मुख्यत्त्वे करून टाक्या (फूलकिडी) या किडीचा व करपा रोगांचा प्रार्दुभाव होतो यांच्या एकत्रित नियंत्रणासाठी लागवडी नंतर १० ते १५ दिवसानी व नंतर १५ दिवसाच्या अंतराने डायथेन एम-४५(०.३%) किवा बावीस्टीन (०.१%) या बुरशीनाशकाची व डायमिथोंएट ३० ईसी १३ एम एल / सायहॅलोथ्रील ६ एम एल / क्वीनल्फोस २५ ईसी २४ एम एल फवारावे.



## कांद्याच्या सुधारीत जाती



भिमा सुपर



भिमा गडद लाल



भिमा लाल



भिमा श्वेता



भिमा शुभ्रा

स्त्रोत : डीओजीआर राजगुरूनगर


मार्गदर्शक

**डॉ. ए.एस. ढवण**

कुलगुरू, वनामकृवि, परभणी

प्रकाशक

**डॉ. डि.बी. देवसरकर**

संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी



व.ना.म.कृ.वि.वि.शि.सं.प्र.क्र.०८/२०२०




# कांदा लागवड व व्यवस्थापन तंत्रज्ञान




डॉ. डी.बी. कच्छवे

डॉ. एस.आर. धांडगे

डॉ. एस.डी. सोमवंशी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी


**कृषि विज्ञान केंद्र, बदनापूर**